**प्रशिक्षण** • राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांची माहिती

# महिला बचत गटांच्या उत्पादनासाठी जिल्ह्यात 'बचत गट बाजार' उभारणार

प्रतिनिधी | नगर

बचत गटांतील महिलांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी प्रज्ज्वला योजनेंतर्गत प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. बचत गटातील महिलांना त्याचा लाभ घेता येईल. दुसऱ्या टप्प्यात 'एक जिल्हा, एक वस्तू' असे क्लस्टर्स तयार करण्यात येणार आहेत. त्यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. तिसऱ्या टप्प्यात बचत गटांच्या उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ मिळण्यासाठी 'बचत गट बाजार' जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्याचे नियोजन आहे, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी बुधवारी दिली.

राज्यभरातील महिला बचत गटांची आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून 'प्रज्ज्वला' योजना राबवण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. त्यावेळी त्या बोलत होत्या. पणन व वस्त्रोद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राम शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आयोगाच्या उपाध्यक्षा उमा खापरे, सदस्या उषा वाजपेयी, पंचायत समिती सभापती साधना कदम, उपसभापती प्रशांत बुद्धिवंत, आंधळकर, उपविभागीय अधिकारी अर्चना नष्टे, तहसीलदार छगन वाघ, गटविकास अधिकारी मुकुंद पाटील, अशोक खेडकर, भाजपचे प्रसाद ढोकरीकर आदी या वेळी उपस्थित होते.

रहाटकर म्हणाल्या, महिलांसाठी विविध कायदे आहेत. त्या कायद्याची माहिती व्हावी, त्याचबरोबर राज्य शासन महिलांसाठी विविध योजना राबवते. त्या योजनांचा त्यांना लाभ घेता यावा, यासाठी या प्रज्ज्वला योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम बचतगटांसाठी आयोजित केले आहेत. बचत गटाच्या महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे मार्केटिंग, विक्री आणि विक्री करण्यासाठी शहरामध्ये जागा, अशा पद्धतीने काम केले जात आहे. बचत गट उत्पादित वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पालकमंत्री शिंदे म्हणाले, ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य महिला आयोगाने उचललेले पाऊल महत्त्वाचे आहे. महिलांना समाजात बरोबरीचे स्थान मिळत आहे. ग्रामीण भागातही ही भावना वाढीस लागावी, महिला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हाव्यात, यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कर्जत-जामखेड हा दुष्काळी भाग आहे. या भागातील महिलांच्या उन्नतीसाठी राज्य महिला आयोग करीत असलेल्या कामांमुळे या भागातील महिलांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले. या वेळी उमा खापरे यांनी बचत गटाच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची बाजारपेठ, त्यासाठीची विक्री व्यवस्था, विविध योजना, त्यांचा लाभ घेण्यासाठी करावयाची कार्यवाही आदींची तपशीलवार माहिती दिली. उषा वाजपेयी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. राज्य महिला आयोगाने प्रकाशित केलेल्या सखी संवाद, कायदे तुमच्यासाठी, प्रज्ज्वला या पुस्तिकांचे वाटप बचत गटाच्या महिलांना करण्यात आले. सभापती साधना कदम, उपसभापती बुद्धिवंत यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलेश दिवटे यांनी केले. राज्य महिला आयोगाच्या वतीने हे प्रशिक्षण कार्यक्रम १८ रोजी व १९ जुलैला नगर, पाथर्डी, नेवासे, श्रीरामपूर, कोपरगाव, राहाता, राहुरी येथे होणार आहेत.



राज्य महिला आयोगाकडून 'प्रज्ज्वला' योजनेच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ दीपप्रज्वलन करून करताना महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर. समवेत पालकमंत्री राम शिंदे, आयोगाच्या उपाध्यक्षा उमा खापरे आदी.



प्रज्ज्वला प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी जिल्ह्यातील महिला.

## राज्यामध्ये सुमारे तीन लाख महिला बचत गट

महिलांसाठी राज्य महिला आयोग काम करीत आहे. राज्यामध्ये सुमारे ३ लाख बचत गट असून त्यांच्याशी सुमारे साठ लाख महिला जोडलेल्या आहेत. हे बचत गट आर्थिक सक्षमीकरणाचा कणा असल्याने आयोगाने बचत गटांना आणखी सक्षम करण्यावर भर दिला आहे. त्यातून प्रज्ज्वला योजना आकारास आली आहे, अशा भावना रहाटकर यांनी व्यक्त केल्या.

सकाळ

# राज्य आयोग महिलांचे दुसरे माहेर

## विजया रहाटकर; कर्जत येथे महिला बचतगट प्रशिक्षण कार्यशाळा

**कर्जत, ता. १७ :** ''महिला राज्य आयोग हे महिलांचे हक्काचे दुसरे माहेर आहे. संकटे आणि अडचणींतून मार्ग काढण्यासाठी सेतूचे काम करते. महिलांच्या हक्क आणि संरक्षणासाठी अनेक कायदे आहेत. मात्र, त्यांबाबत जागृती आणि जाणीव होणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी केले.

राज्य महिला आयोग आणि राज्य सरकारच्या प्रज्वला योजनेअंतर्गत पंचायत समितीच्या विद्यमाने महिला बचतगट प्रशिक्षण कार्यशाळेत प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. पालकमंत्री राम शिंदे, सदस्यत्व नोंदणीचे जिल्हाप्रमुख प्रसाद ढोकरीकर, तालुकाध्यक्ष अशोक खेडकर, सभापती साधना कदम, उपसभापती प्रशांत बुद्धिवंत, माजी सभापती महानंदा आंधळकर, प्रज्वला समितीच्या सदस्य उषा वाजपेयी व उषा खापरे, डॉ. कांचन खेत्रे, अशा वडे, अशा क्षीरसागर, कांतिलाल घोडके, प्रांत अर्चना नष्टे, तहसीलदार छगन वाघ, गटविकास अधिकारी मुकुंद पाटील, कृष्णा काळे, सुजाता झरेकर, शिवाजी नवले उपस्थित होते.

राम शिंदे म्हणाले, ''प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने यश मिळवितात. महिलांनी त्यांचे हक्क, अधिकार आणि कायदे समजून घेणे आवश्यक आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे.''



**कर्जत : महिला बचतगट प्रशिक्षण कार्यशाळेचे दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर. समवेत पालकमंत्री राम शिंदे, प्रसाद ढोकरीकर, तालुकाध्यक्ष अशोक खेडकर, सभापती साधना कदम, उषा वाजपेयी आदी. (छायाचित्र : नीलेश दिवटे)**

> **महिलांनी भीती दूर करून धाडसाने प्रसंगाला सामोरे जावे. महिला बचतगट उत्पादने, शेतीसह विविध प्रकारांत अग्रेसर आहेत. मात्र, उत्पादित केलेले पदार्थ किंवा वस्तू 'जेथे पिकते तेथे विकत नाही' या उक्तीप्रमाणे योग्य दरात विकल्या जात नाहीत. त्यांना बाजारपेठ मिळवून देण्याचे काम राज्य महिला आयोगाच्या सहकार्यातून प्रज्वला योजनेत केले जाईल.**
>
> **- विजया रहाटकर,**
> राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष

# बचतगटांना ओळख मिळण्यासाठी क्लस्टर्स तयार करणार

## विजया रहाटकर : महिला आयोगातर्फे सुरू करण्यात आलेल्या प्रज्ज्वला योजनेचा केला प्रारंभ

**कर्जत, दि. १७ (प्रतिनिधी)** - बचतगटांतील महिलांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी प्रज्ज्वला योजनेअंतर्गत प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. आगामी काळात या योजनेतून 'एक जिल्हा, एक वस्तू' असे क्लस्टर्स तयार करण्यात येणार आहेत. त्यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. तिसऱ्या टप्प्यात बचतगटांच्या उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ मिळण्यासाठी 'बचतगट बाजार' जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्याचे नियोजन आहे, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली.

राज्यभरातील महिला

### जिल्ह्याच्या ठिकाणी उभारणार बचतगट बाजार

बचतगटांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून प्रज्ज्वला योजना राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा कर्जत प्रारंभ करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. पालकमंत्री प्रा. राम शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आयोगाच्या उपाध्यक्षा उमा खापरे, सदस्या उषा वाजपेयी, पंचायत समिती सभापती साधना कदम, उपसभापती प्रशांत बुद्धिवंत, आंधळकर,



उपविभागीय अधिकारी अर्चना नष्टे, तहसीलदार छगन वाघ, गटविकास अधिकारी मुकुंद पाटील, अशोक खेडकर, प्रसाद ढोकरीकर आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

रहाटकर म्हणाल्या, महिलांसाठी विविध कायदे आहेत. त्या कायद्यांची माहिती व्हावी, त्याचबरोबर राज्य शासन महिलांसाठी विविध योजना राबविते. त्या योजनांचा त्यांना लाभ घेता यावा, यासाठी या प्रज्ज्वला योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम बचतगटांसाठी आयोजित केले आहेत. बचत गटाच्या महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे मार्केटींग, विक्री आणि विक्री करण्यासाठी शहरामध्ये जागा, असा पद्धतीने

### विविध तालुक्यांत देणार प्रशिक्षण

राज्य महिला आयोगाच्या वतीने जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील महिला बचतगटांना हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. १८ व १९ जुलै रोजी नगर, पाथर्डी, नेवासा, श्रीरामपूर, कोपरगाव, राहता, राहुरी येथे हा प्रशिक्षण कार्यक्रम होणार आहे.

काम केले जात आहे. बचतगट उत्पादित वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत, असे त्या म्हणाल्या. ना. शिंदे म्हणाले, ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य महिला आयोगाने उचललेले पाऊल महत्त्वाचे आहे. महिलांना समाजात बरोबरीचे स्थान मिळत आहे. ग्रामीण भागातही ही भावना वाढीस लागावी, महिला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हाव्यात, यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. खापरे यांनी बचतगटांच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची बाजारपेठ, त्यासाठीची विक्रीव्यवस्था, विविध योजना, त्यांचा लाभ घेण्यासाठी करावयाची कार्यवाही आदींची तपशीलवार माहिती दिली. राज्य महिला आयोगाने प्रकाशित केलेल्या सखी संवाद, कायदे तुमच्यासाठी, प्रज्ज्वला या पुस्तिकांचे वाटप बचतगटाच्या महिलांना करण्यात आले.

प्रभात Thu, 18 July 2019
epaper.eprabhat.net/c/41517328

# महिलांच्या आत्मनिर्भतेसाठी महिला आयोग पाठिशी

## विजया रहाटकर : बचत गटांसाठीच्या 'प्रज्ज्वला' प्रशिक्षणास सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर** : बचत गटांतील महिलांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी प्रज्ज्वला योजनेंतर्गत प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. विविध योजनांची माहिती घेऊन बचत गटातील महिलांना त्याचा लाभ घेता येईल. महिला आयोग नेहमीच महिलांच्या पाठिशी आहे, अशी ग्वाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली.

राज्यभरातील महिला बचत गटांची आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून प्रज्ज्वला योजना राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ कर्जत येथे करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. पालकमंत्री प्रा. राम शिंदे, आयोगाच्या उपाध्यक्षा उमा खापरे, सदस्या उषा वाजपेयी, पंचायत समिती सभापती साधना कदम, उपसभापती प्रशांत बुद्धिवंत, उपविभागीय अधिकारी अर्चना नष्टे, तहसीलदार छगन वाघ, गटविकास अधिकारी मुकुंद पाटील, अशोक खेडकर, प्रसाद ढोकरीकर आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. रहाटकर म्हणाल्या, महिलांसाठीच्या कायद्याची, तसेच त्यांच्यासाठी शासनाच्या योजनांची माहिती या शिबिरातून होणार आहे. बचत गट उत्पादित वस्तुंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. जाणीवजागृती बरोबरच आत्मनिर्भरता महिलांमध्ये यावी, यासाठी प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळेच त्यांच्यासाठी काम करणारे महिला आयोग हे महिलांना दुसरे माहेर वाटते, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

उपस्थित होते.

# महिलांच्या आत्मनिर्भरतेसाठी महिला आयोग पाठीशी : विजया रहाटकर

**अहमदनगर** : बचत गटातील महिलांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी प्रज्ज्वला योजनेअंतर्गत प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. विविध योजनांची माहिती घेऊन बचत गटातील महिलांना त्याचा लाभ घेता येईल दुसऱ्या टप्प्यात 'एक जिल्हा, एक वस्तु' असे क्लस्टर्स तयार करण्यात येणार आहेत. त्यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. तिसऱ्या टप्प्यात बचत गटाच्या उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ मिळण्यासाठी 'बचत गट बाजार' जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्याचे नियोजन आहे', अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनी दिली.



राज्यभरातील महिला बचत गटांची आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून 'प्रज्वला' योजना राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा अहमदनगर जिल्ह्यातील शुभारंभ कर्जत येथे करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. राम शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आयोगाच्या उपाध्यक्षा उमा खापरे, सदस्या उषा वाजपेयी, पंचायत समिती सभापती साधना कदम, उपसभापती प्रशांत बुद्धिवंत, श्रीमती आंधळकर, उपविभागीय अधिकारी अर्चना नष्टे, तहसीलदार छगन वाघ, गटविकास अधिकारी मुकुंद पाटील, अशोक खेडकर, प्रसाद ढोकरीकर आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी श्रीमती रहाटकर म्हणाल्या, महिलांसाठी विविध कायदे आहेत. त्या कायद्याची माहिती व्हावी, त्याचबरोबर राज्य शासन महिलांसाठी विविध योजना राबविते. त्या योजनांचा त्यांना लाभ घेता यावा, यासाठी या प्रज्ज्वला योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम बचतगटांसाठी आयोजित केले आहेत. बचत गटाच्या महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे मार्केटींग, विक्री आणि विक्री करण्यासाठी शहरामध्ये जागा असा पद्धतीने काम केले जात आहे. बचत गट उत्पादित वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत, असे त्या म्हणाल्या.

महिलांसाठी राज्य महिला आयोग काम करीत आहे. राज्यामध्ये सुमारे ३ लाख बचत गट असून त्यांच्याशी सुमारे साठ लाख महिला जोडलेल्या आहेत. हे बचत गट आर्थिक सक्षमीकरणाचा कणा असल्याने आयोगाने बचत गटांना आणखी सक्षम करण्यावर भर दिला आहे. त्यातून प्रज्ज्वला योजना आकारास आली आहे. जाणीव जागृतीबरोबरच आत्मनिर्भरता महिलामध्ये यावी, यासाठी प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळेच त्यांच्यासाठी काम करणारे महिला आयोग हे महिलांना दुसरे माहेर वाटते, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

पालकमंत्री प्रा. शिंदे म्हणाले, ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य महिला आयोगाने उचललेले पाऊल महत्वाचे आहे. महिलांना समाजात बरोबरीचे स्थान मिळत आहे. ग्रामीण भागातही ही भावना वाढीस लागावी, महिला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हाव्यात, यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कर्जत-जामखेड हा दुष्काळी भाग आहे. या भागातील महिलांच्या उन्नतीसाठी राज्य महिला आयोग करीत असलेल्या कामांमुळे या भागातील महिलांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी श्रीमती खापरे यांनी बचत गटाच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची बाजारपेठ, त्यासाठीची विक्रीव्यवस्था, विविध योजना, त्यांचा लाभ घेण्यासाठी करावयाची कार्यवाही आदींची तपशील-वार माहिती दिली. उषा वाजपेयी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

राज्य महिला आयोगाने प्रकाशित केलेल्या सखी संवाद, कायदे तुमच्यासाठी, प्रज्वलाया पुस्तिकांचे वाटप बचत गटाच्या महिलांना करण्यात आले.

सभापती साधना कदम, उपसभापती बुद्धिवंत यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नीलेश दिवटे-पाटील यांनी केले. राज्य महिला आयोगाच्यावतीने हे प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक १८ रोजी व १९ रोजी अहमदनगर, पाथर्डी, नेवासा, श्रीरामपूर, कोपरगाव, राहता, राहुरी येथे होणार आहेत.